# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे -०४.

सर्व्हे नं. ८३२ अ, फायनल प्लॉट क्र. १७८/१७९, बी.एम.सी.सी.रोड,
बालचित्रवाणी शेजारी, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे -४११ ००४

फोन नं. ०२०-२५७०५००० फॅक्स नं.०२०-२५७०५१२२/२५६६५८०८


क्र.रा.मं./पापुई-७/५७८६
पुणे - ४११ ००४
दिनांक: २२ नोव्हेंबर२०१९.

प्रति,

विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे,
पुणे/मुंबई/नागपूर/औरंगाबाद/कोल्हापूर/
अमरावती/नाशिक/लातूर/रत्नागिरी

**विषय:-समग्र शिक्षा अभियान (राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान)अंतर्गत शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांकरिता व्यवसाय शिक्षण योजना राबविण्याकरिता विषयांचे विकल्प देणेबाबत**

**संदर्भ:-१.दिनांक-२१ ऑगस्ट २०१४ चा शासन निर्णय..**
**२.दिनांक-१४ मे २०१५ चा शासन निर्णय..**
**३.दिनांक-२६ सप्टेंबर २०१६ चा शासन निर्णय..**
**४.शासन निर्णय क्रमांक:व्य.शि.२०१९/प्र.क्र.७०/एसडी-६.मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक-०१ नोव्हेंबर,२०१९**

उपरोक्त विषयाच्या संदर्भीय शासन निर्णयानुसार कळविण्यात येते की, **दिनांक २१ऑगस्ट,२०१४** च्या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानंतर्गत माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांकरिता व्यवसाय शिक्षण योजना राबविण्यास सुरुवात करण्यात आलेली आहे.सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र.४ मध्ये शाळांनी व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम सुरु केल्यास विद्यार्थ्यांसाठी विषयनिहाय गुणरचना देण्यात आली आहे.तसेच त्यामध्ये विद्यार्थ्यांना विषय निवडीचे विकल्पही देण्यात आले आहेत.शासन निर्णय **दिनांक १४ मे,२०१५** रोजीच्या शुध्दीपत्रकाने इंग्रजी व्यतिरिक्त इतर माध्यमांच्या विद्यार्थ्यांना द्वितीय भाषेऐवजी व्यवसाय विषय निवडण्याचे व इंग्रजी माध्यमांच्या विद्यार्थ्यांना भाषा-२ अथवा भाषा-३ ऐवजी व्यवसाय विषय निवडण्याची मुभा देण्यात आली होती.या शुद्धीपत्रकान्वये केलेले बदल हे प्रथमत: सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापुरते लागू होते.परंतु **दि.२६ सप्टेंबर,२०१६** रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार, शैक्षणिक वर्ष सन २०१६-१७ पासून उपरोक्त पर्यायासोबतच सर्व माध्यमांच्या विषयांना सामाजिक शास्त्रे या विषयाऐवजीही व्यवसाय विषय निवडण्याची मुभा देण्यात आली.मात्र माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परिक्षा-२०१९ मध्ये हिंदी,उर्दू,गुजराती इ. माध्यमांच्या काही शाळांनी मराठी विषय वगळून व्यवसाय विषय निवडलेले आहेत.त्यामुळे शासनाच्या मराठी विषय अनिवार्य असल्याच्या धोरणाला बाधा येत आहे.या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये,यासाठी शासनाने दि.१४ मे,२०१५ चे शुद्धीपत्रक व त्याआधारे दि.२६ सप्टेंबर,२०१६ च्या शासन निर्णयामध्ये नमूद संबंधित परिच्छेद वगळून सदर शासन निर्णयातील आवश्यक भाग प्रस्तुत शासन निर्णयात समाविष्ट करुन दि.२६ सप्टेंबर,२०१६ रोजीचाही शासन निर्णय अधिक्रमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.वरील विचार करुन शासनाने संदर्भीय खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

१.मराठी माध्यमांच्या शाळांना द्वितीय भाषा किंवा सामाजिक शास्त्रे या विषयांऐवजी व्यवसाय विषय निवडता येतील.तर इंग्रजी व इतर माध्यमांच्या शाळांना मराठी विषय अनिवार्य राहील,मात्र सामाजिक शास्त्रे किंवा अन्य भाषा या विषयां ऐवजी व्यवसाय विषय निवडता येतील.

२. NSQF रचनेनुसार तसेच केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे या योजनेकरिता व्यवसाय विषय ज्या शाळांमध्ये सुरु करण्यात आलेले आहेत,तेथे दोन व्यवसाय विषयाचे ट्रेड व विद्यार्थी संख्या २५ (प्रत्येक ट्रेडकरिता) असे निश्चित करण्यात आलेले आहे.त्यानुसार राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत केंद्र शासनातर्फे ज्या शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमिक शाळांमध्ये व्यवसाय विषय सुरु करण्यास परवानगी मिळालेली आहे,त्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना व्यवसाय विषय घेण्यासाठी उपरोक्त प्रमाणे परवानगी देण्यात येत आहे.

३.केंद्र शासनाने मंजूरी दिलेल्या व्यवसाय विषयांचा अभ्यासक्रम पंडित सुंदरलाल शर्मा सेंट्रल इन्स्टिट्यूट फॉर व्होकेशनल एज्युकेशन,भोपाळ या संस्थेने निश्चित केलेल्या अभ्यासक्रमाप्रमाणे राहील.तसेच या शाळांमध्ये व्यवसाय प्रयोगशाळा उभारण्याची तसेच National Skill Development Council (NSDC) च्या सहकार्याने व्यवसाय विषय निदेशक (ट्रेनर्स) नियुक्त करण्याची जबाबदारी समग्र शिक्षा अभियान या कार्यालयाची राहील.

उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत आपल्या स्तरावर कळविण्यात यावे.

(डॉ.अशोक भोसले)
**सचिव**
राज्य मंडळ,पुणे-४

**प्रत माहितीस्तव सविनय सादरः**

१. मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
२. मा. आयुक्त (शिक्षण), पुणे
३. मा. राज्य प्रकल्प संचालक, मप्राशिप, मुंबई
४. मा. अतिरिक्त आयुक्त, मुंबई महानगरपालिका
५. मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका

**प्रत माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी:**

१. सर्व विभागीय सचिव, सर्व विभागीय मंडळे,
   - उपरोक्त परिपत्रक सर्व संबंधित शाळांना पाठविण्याची कार्यवाही करावी.
२. मा.राज्य प्रकल्प समन्वयक, समग्र शिक्षा अभियान, मुंबई
३. विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग
४. शिक्षणाधिकारी (माध्य.), सर्व जिल्हा परिषदा
५. शिक्षणाधिकारी (माध्य.), पुणे व मुंबई महानगरपालिका
६. प्रशासनअधिकारी, सर्व महानगरपालिका शिक्षण मंडळे.

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर -४१६ ००४.**

---

क्र.कोविमं/शाखा माध्य परीक्षा/ 2513
कोल्हापूर ४१६००४.
दिनांक:-२७/११/२०१९

प्रति,

सर्व मान्यताप्राप्त शाळा प्रमुख
सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्हा.

**राज्य मंडळाचे जा. क्र.रा.मं./पापुई-७/५७८६ दि.२२/११/२०१९** रोजीच्या स्वमग्र शिक्षा अभियान (राष्टीय माध्यमिक शिक्षा अभियान) अंतर्गत शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांकरीता व्यवसाय शिक्षण योजना राबविण्याकरीता विषयांचे विकल्प देण्याबाबतच्या पत्राची या विभागीय मंडळाच्या अखत्यारीतील सर्व शाळाप्रमुखांनी नोंद घेऊन पुढील कार्यवाही करावी.

27.11.19
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

समग्र शिक्षा अभियान (राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान) अंतर्गत शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांकरीता व्यवसाय शिक्षण योजना राबविण्याकरीता विषयांचे विकल्प देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
शासन शुद्धीपत्रक क्रमांकः- व्यशि-२०१९/प्र.क्र.७०/एसडी-६
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय,मुंबई-४०००३२
दि.२१ नोव्हेंबर,२०१९

**वाचाः-** शासन निर्णय,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः- व्यशि-२०१९/प्र.क्र.७०/एसडी-६, दि.०१ नोव्हेंबर,२०१९.

**शुद्धीपत्रकः-**

केंद्र शासनाने समग्र शिक्षा योजनेंतर्गत निर्गमित केलेल्या मसुद्यात व्यवसाय शिक्षण विषय शिकविणा-या शाळांमध्ये प्रत्येक ट्रेडकरीता विद्यार्थी संख्या ४० इतकी असावी,असे नमूद करण्यात आले असल्याने या विभागाच्या वरील **दि.०१ नोव्हेंबर,२०१९ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयात प्रत्येक ट्रेडकरीता नमूद करण्यात आलेल्या २५ इतक्या विद्यार्थी संख्येऐवजी प्रत्येक ट्रेडकरीता ४० इतकी विद्यार्थी संख्या असे वाचण्यात यावे.**

**(दत्तात्रय छ. शिंदे)**
**कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन**

**प्रतः**

१. मा. राज्यपालांचे सचिव,राजभवन,मुंबई
२. मा.मंत्री,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे खाजगी सचिव
३. मा.अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक
४. मा.अपर मुख्य सचिव,कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांचे स्वीय सहायक
५. आयुक्त (शिक्षण),महाराष्ट्र राज्य,पुणे
६. राज्य प्रकल्प संचालक,समग्र शिक्षा,मुंबई
७. अध्यक्ष,माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,महाराष्ट्र राज्य,पुणे
८. शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे
९. सर्व विभागीय अध्यक्ष,माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
१०. सर्व विभागीय सचिव,माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
११. सर्व विभागीय शिक्षण उप संचालक
१२. सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), सर्व जिल्हा परिषद
१३. सर्व सहसचिव/उप सचिव, शालेय शिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई
१४. निवड नस्ती,एसडी-६

M. S. BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,KOLHAPUR
DIVI. BOARD,KOLHAPUR
27 NOV 2019
INWARD NO. 5686
BR. SING.

समग्र शिक्षा अभियान (राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान) अंतर्गत शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांकरीता व्यवसाय शिक्षण योजना राबविण्याकरीता विषयांचे विकल्प देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
शासन शुद्धीपत्रक क्रमांकः- व्यशि-२०१९/प्र.क्र.७०/एसडी-६
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दि.२१ नोव्हेंबर,२०१९

**वाचाः**- शासन निर्णय,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः- व्यशि-२०१९/प्र.क्र.७०/एसडी-६, दि.०१ नोव्हेंबर,२०१९.

**शुद्धीपत्रकः-**

केंद्र शासनाने समग्र शिक्षा योजनेंतर्गत निर्गमित केलेल्या मसुद्यात व्यवसाय शिक्षण विषय शिकविणा-या शाळांमध्ये प्रत्येक ट्रेडकरीता विद्यार्थी संख्या ४० इतकी असावी,असे नमूद करण्यात आले असल्याने या विभागाच्या वरील **दि.०१ नोव्हेंबर,२०१९ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयात प्रत्येक ट्रेडकरीता नमूद करण्यात आलेल्या २५ इतक्या विद्यार्थी संख्येऐवजी प्रत्येक ट्रेडकरीता ४० इतकी विद्यार्थी संख्या असे वाचण्यात यावे.**

**(दत्तात्रय छ. शिंदे)**
**कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन**

**प्रतः**

१. मा. राज्यपालांचे सचिव,राजभवन,मुंबई
२. मा.मंत्री,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे खाजगी सचिव
३. मा.अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक
४. मा.अपर मुख्य सचिव,कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांचे स्वीय सहायक
५. आयुक्त (शिक्षण),महाराष्ट्र राज्य,पुणे
६. राज्य प्रकल्प संचालक,समग्र शिक्षा,मुंबई
७. अध्यक्ष,माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,महाराष्ट्र राज्य,पुणे
८. शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे
९. सर्व विभागीय अध्यक्ष,माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
१०. सर्व विभागीय सचिव,माध्यमिक व उच्च माध्यमिक सिक्षण मंडळ
११. सर्व विभागीय शिक्षण उप संचालक
१२. सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), सर्व जिल्हा परिषद
१३. सर्व सहसचिव/उप सचिव, शालेय शिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई
१४. निवड नस्ती,एसडी-६